● सोमवार, दि. २० जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १७३ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## भागवत कथेत प्रत्येक प्रश्न व समस्यांचे समाधान- गोवत्स राधाकृष्णजी महाराज

**जालना | प्रतिनिधी -** श्रीमद् भागवत कथेत सर्व ग्रंथ आणि वेदांचे मिश्रण असून, कथा हा बुद्धीचा नव्हे तर हृदयाचा विषय आहे. सर्व प्रश्न आणि समस्यांचे उत्तर अर्थात समाधान भागवत कथा श्रवण असल्याने जिथे कुठे कथा असेल तेथे श्रवण करण्यासाठी जाऊन आपले जीवन यथार्थ बनवावे, असा उपदेश गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज यांनी येथे बोलताना केला.

भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने येथील भोकरदन रोडवरील ब्रज धाममध्ये सुरू असलेल्या श्रीमद् भागवत कथेच्या आज रविवार दि. १९ जानेवारी रोजी दुसऱ्या दिवशीच्या कथेत भागवत ग्रंथाची निर्मिती कशी झाली, यावर राधाकृष्ण महाराजांनी निरूपण केले. ते म्हणाले की, प्रत्येकाला समस्या आणि प्रश्नांची चिंता आहे. मात्र, मृत्यूच्या प्रश्नाची चिंता कुणालाच नाही. कधी मृत्यू, होणार कसा होणार याचा साधा विचारही कोणी करत नाहीत. अमृत सेवनाने मृत्यू टाळता येऊ शकतो. मात्र, भागवत कथेच्या श्रवणाने जन्म-मृत्यूचा फेरा चुकविला जाऊ शकतो. बारा वर्षाच्या कालखंडानंतर कुंभ अमृत योग येतो. मात्र, भागवत कथा म्हणजे प्रत्येक दिवशी कुंभ अमृत योग आहे, असे त्यांनी सांगितले.

मातेचा महिमा विषद करताना राधाकृष्णजी महाराज म्हणाले की, अनेक जण वृद्ध माता-पित्यांकडे दुर्लक्ष करतात. वृद्धापकाळी हेळसांड करतात. वास्तविक पाहता वृद्ध आई घराची शोभा वाढविते. या जगतात आई हेच एकमेव पवित्र आणि शुद्ध नाते आहे. कारण ते थेट परमात्म्याची



कनेक्ट आहे. बाकी इतर सर्व नात्यात भेसळ आहे. एक वेळ मुले आईबद्दल वाईट चिंतू शकतील. मात्र, आई मुलांबद्दल साधा वाईट विचारही मनात कधी येऊ देत नाही. जेव्हा अशी परिस्थिती उद्भवेल तेव्हा ही धरणीमाता दुभंगली जाईल, भूकंप येईल, अशा शब्दात महाराजांनी आईचा महिमा विषद केला. हा प्रसंग वर्णन करताना महाराजांसह भाविकांच्या डोळ्यात अश्रू तरळले. सर्वांनाच गहिवरून आले.

वाईट मार्गाने कमावलेली संपत्ती कदापिही सुख मिळू देत नाही. त्यामुळे भौतिक सुविधा, उदरनिर्वाहाच्या जीवनाशक वस्तू कमी असतील तरी चालतील. मात्र, वाईट मार्गाने संपत्ती कमवू नका, असा सल्ला महाराजांनी दिला. यावेळी त्यांनी विवाह आणि इतर सोहळ्यातील बफे या पाश्चात्य संस्कृतीवर ताशेरे ओढले. आजघडीला सर्वांनी स्वयंपाक घराला किचन करून टाकले. किचन फक्त हॉटेलमध्ये असते. कारण तेथे व्यवहार वृत्ती असते. पैसे कमवण्यासाठी तेथे स्वयंपाक केला जातो. याउलट, स्वयंपाकघर म्हणजे साक्षात अन्नपूर्णा असते. स्वयंपाक घरात अत्यंत प्रेमाने आणि भक्तीभवाने स्वयंपाक केला जातो. हॉटेलमधील किचनमध्ये कशी परिस्थिती असते, हे सांगण्याची गरज नाही. खंत याची वाटते की, स्वयंपाक घरात चप्पल पोचली आहे. उभ्याने स्वयंपाक करणे भारतीय संस्कृतीत नाही. त्याला शास्त्रीय आणि वैद्यकीय आधार आहे. बसून स्वयंपाकामुळे मागे - पुढे होण्याने पाठीचा व्यायाम होतो. पूर्वी सर्वजण खाली बसून जेवत असत. नंतर टेबलवर आणि आता बफेमध्ये उभ्याने जेवण सुरू झाले आहे. बफेमुळे अन्नाची नासाडी होते. टेबलवरील पदार्थ आणि वाढण्याचे चमचे, चिमटे, पळ्यांना सर्वांचे हात लागतात आणि आपण अशा उष्ट्या जेवणाचा स्वाद घेतो. त्यामुळे जेथे कुठे बफे पद्धत सुरू असेल तेथे फक्त भेटून आणि नमस्कार करून यावे. मात्र, तेथील उष्ट्या अण्णाला हातदेखील लावणार नाही, असा संकल्प प्रत्येकाने करावा, असे राधाकृष्णजी महाराज म्हणाले.

संत महिमा खूप मोठा आहे. त्यामुळेच संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा असे आपण म्हणतो. ज्याप्रमाणे आई आपल्या लहान मुलाला कडेवर घेऊन चालते, त्याप्रमाणे संत परमात्म्याला हृदयात घेऊन चालतात. त्यामुळे त्यांच्या येण्याने सर्वांना आनंद होतो. आत्मा, परमात्मा आणि महात्मा एकच असल्याचे महाराजांनी स्पष्ट केले. आजच्या कथेला भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## महसूल विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न



**जालना | प्रतिनिधी -** जालना जिल्हा महसूल विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आज येथील जिल्हा पोलीस मैदानावर आयोजन करण्यात आले होते. जालना जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांच्या हस्ते क्रिडा स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची उपस्थिती होती. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी रीता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी सविता सुत्रावे यांच्यासह सर्व उपजिल्हाधिकारी सर्व **पान २ वर**

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्यालयाचे आज उदघाटन

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार उदघाटन

**जालना | प्रतिनिधी-** येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्यालयाचे सोमवार (दि २०) रोजी सकाळी आठ वाजता उदघाटन होणार आहे. पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते जिल्हा कार्यालयाचे उदघाटन संपन्न होणार आहे.

अंबड चौफुली- मंठा चौफुली रिंग रोडवरील शासकीय वैद्यकिय महाविद्यालया जवळ असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्यालयाच्या उदघाटन सोहळ्यास शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे, पार्थी मतदार संघाचे आमदार राजेश विटेकर, सिंदखेड राजा मतदार संघाचे आमदार मनोज कायंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी वेळेवर हजर राहावे असे आवाहन, जिल्हाध्यक्ष अरविंद. चव्हाण यांनी केले आहे.

युवा आदर्श

### सराय ...

आगंतुकांचीचं गर्दी
तुडुंब भरली सराय
पांथस्थ ताटकळले
जंद्द५गल सफर करायं
जिकडे बूट चपला
तिकडे वळती पाय
रिकामी खुर्ची दिसे
दुसऱ्या पक्षात जाय
शिळ्या दूधा उकळे
कशी येणारं रे साय
कोंडवाड्यात बांधी
भाकड बनता गाय
निष्ठावंत आहे बोले
का रडता धाय धाय
डोक्या आभाळ पडे
देगं माय धरणी ठाय
बुकींग सगळे फुल्ल
आता करायचे काय
लोणी रात्री पळवले
भाकर कोरडी खाय
पुढे करणार हो काय
कशाला विचारे राय
है विधानसभा बाकी
जिद्द सोडलेली नाय

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## खोतकर - अंबेकरांनी एकत्र येण्याची डबलजीन रहिवाशांची अपेक्षा

**जालना | प्रतिनिधी -** डबल जीन भागाचे नाव शिवनेरी नगर नामकरण फलकाचे आमदार अर्जुन खोतकर माजी नगराध्यक्ष भास्कर आंबेकर यांच्या हस्ते संपन्न झाले. दरम्यान, यानिमित्त आयोजित कार्यक्रमात तेथील रहिवाशांनी अर्जुनराव खोतकर आणि भास्कर अंबेकर यांनी एकत्रित यावे, अशी जाहीर अपेक्षा व्यक्त केली.

जालन्याच्या डबल जीन भागातील नागरिकांनीप्रथमच अशी अपेक्षा व्यक्त केली.डबल जीन येथे रविवारी आमदार अर्जुन खोतकर आणि माजी नगराध्यक्ष भास्कर आंबेकर. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष भास्करराव दानवे यांच्या हस्ते डबल जीन भागाचे शिवनेरी नगर नामकरण फलकाचे उद्घाटन करण्यात आले आहे यावेळी आमदार अर्जुन खोतकर शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर आंबेकर रिपाईचे मराठवाडा अध्यक्ष ब्राह्मानंद चव्हाण भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष भास्करराव दानवे माजी नगराध्यक्ष राजेश राऊत भाजपचे महिला जिल्हाध्यक्ष संध्या संजय देठे पत्रकार राहुल मुळे आशिष पाचफुले मराठा महासंघाचे युवक जिल्हाध्यक्ष शैलेश देशमुख आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित नागरिकांनी खोतकर आणि आंबेकर यांनी पुन्हा एकत्रित यावे अशी इच्छा बोलून दाखवली आहे. अर्जुन खोतकर आणि भास्कर आंबेकर दोन्ही राजकारणी महाविद्यालयीन जीवनापासून एकमेकांचे सहकारी असून दोघांनी राजकारणात एकत्रितपणे काम पाहिले आहे. मात्र, मधल्या काळामध्ये शिवसेनेत फूट पडली आणि एका शिवसेनेच्या २ शिवसेना झाल्या. आमदार अर्जुन खोतकर यांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला तर आंबेकर हे



उद्धव ठाकरें सोबतच राहिले. मात्र, आता दोन्ही जुन्या सहकाऱ्यांनी पुन्हा एकत्रित यावे अशी मागणी जालनाच्या डबल जिम भागातील नागरिकांनी व्यक्त केलीय. ठाकरे शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर आंबेकर **पान २ वर**



**संपादकीय**

## चॅम्पियन ट्रॉफी साठी संतुलित संघ निवड

पुढील महिन्यात १९ फेब्रुवारी ते ९ मार्च या कालावधीत पाकिस्तान आणि दुबई येथे एकदिवसीय सामन्यांची चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धा होणार असून या स्पर्धेसाठी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर व कर्णधार रोहित शर्मा यांनी यांनी १८ तारखेला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. या संघात रोहित शर्मा व युवा शुभमन गिल हे भारताचे अनुभवी आणि युवा खेळाडू भारताच्या डावाची सुरवात करतील. विशेष म्हणजे हे दोघे या संघाचे कर्णधार आणि उपकर्णधार आहेत यांच्यासोबत तिसरा सलामीवीर म्हणून यशस्वी जयस्वाल ची निवड करण्यात आलेली आहे. मधल्या फळीची जबाबदारी अनुभवी विराट कोहली, , श्रेयस अय्यर, के एल राहुल तसेच यष्टीरक्षक ऋषभ पंत यांच्यावर टाकण्यात आली आहे अनुभवी के एल राहुल हा अतिरिक्त यष्टीरक्षक म्हणूनही जबाबदारी पार पाडेल. विशेष म्हणजे दोघेही उत्तम फिनिशर म्हणून आपली जबाबदारी पार पाडतात. भारताची फलंदाजी अतिशय बलवान असून रोहित, शुभमन व विराट हे पहिल्या तीन क्रमांकाचे फलंदाज जगातील सर्वोत्तम फलंदाज मानले जातात. एकदिवसीय सामन्यात या तिघांची कामगिरी उत्तम असून तिघेही एकदिवसीय सामन्यातील श्रेष्ठ फलंदाज समजले जातात. भारतात झालेल्या एकदिवसीय विश्वचषकात तसेच मागील वर्षी वेस्ट इंडिज मध्ये झालेल्या टी २० विश्वचषकात तिघांनीही चांगली कामगिरी केली आहे. या तिघांची कसोटीतील कामगिरी त्यांच्या लैकिकास साजेशी झालेली नाही त्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली असली तरी मर्यादित षटकांच्या सामन्यात त्यांची कामगिरी नजरेत भरणारी आहे. सध्या जरी ते त्यांच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नसतील तरी ते या स्पर्धेत पुन्हा आपल्या पूर्वीच्या फॉर्ममध्ये येऊ शकतात ते जर पुन्हा फॉर्मात आले तर चॅम्पियन ट्रॉफी जिंकण्याच्या भारताच्या आशा पल्लवित होतील. चौथ्या क्रमांकावर युवा श्रेयस अय्यर येईल. भारताचा तो भरवशाचा फलंदाज असून एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत त्याने पाचशे पेक्षा अधिक धावा काढल्या आहेत. तो फ्लॉप गेला तर त्याची जागा के एल राहुल घेईल. तो मैदानात सर्वत्र फटकेबाजी करू शकतो. तोही भारताचा भरवशाचा फलंदाज मानला जातो. त्यानंतर ऋषभ पंत हा धडाकेबाज यष्टीरक्षक फलंदाज मैदानात येईल. तो स्फोटक फलंदाज असून मॅच फिनिशर आहेत. कमी चेंडूत जास्त धावा काढून संघाला विजय मिळवून देण्यात त्याचा हातखंडा आहे. त्यानंतर हार्दिक पांड्या हा जगातील सध्याचा सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू येईल. तो गोलंदाजी, तडाखेबंद फलंदाजी आणि प्रभावी क्षेत्ररक्षण करून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावतो. त्याने आपल्या अष्टपैलू खेळीने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. वॉशिंग्टन सुंदर हा आणखी एक अष्टपैलू खेळाडू भारतीय संघात आहे. ऑफस्पिन गोलंदाजी आणि तडाखेबंद फलंदाजी हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. गोलंदाजीमध्ये निवड समितीने तीन फिरकी गोलंदाजांना संधी दिली असून अनुभवी रवींद्र जडेजा सोबत फॉर्मात असलेला चायनामन गोलंदाज कुलदीप यादव आणि लेफ्ट आर्म स्पिनर अक्षर पटेल यांना संधी मिळाली आहे. तिघेही डावखुरे मंदगती गोलंदाज आहेत त्यामुळे मंदगती गोलंदाजीत विविधता नसल्याची टीका टीकाकार करीत असले तरी तिघेही फॉर्ममध्ये आहे. जडेजा हा भारताचा सर्वोत्तम मंदगती गोलंदाज आहे शिवाय तो फलंदाजीही करतो आणि चांगला क्षेत्ररक्षक आहे म्हणजे तो एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आहे. कुलदीप यादव जरी डावखुरा असला तरी तो चायनामन गोलंदाज आहे आणि विशेष म्हणजे तो फॉर्ममध्ये आहे. फॉर्ममध्ये असलेल्या खेळाडूला संधी देणे केंव्हाही चांगले. अक्षर पटेल गोलंदाजीसोबत फलंदाजीही करू शकतो त्याची फलंदाजी भारतासाठी बोनस ठरेल. जसप्रीत बुमराह व मोहम्मद शमी या अनुभवी वेगवान गोलंदाजांसोबत अर्शदिप सिंग या युवा गोलंदाजाला देखील निवड समितीने संधी दिली आहे. निवड समितीने या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला संधी देऊन वेगवान गोलंदाजीत विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे. मर्यादित षटकांच्या सामन्यात डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाचे महत्व अनन्यसाधारण आहे. २०११ साली झहीर खान या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने अप्रतिम कामगिरी करून भारताला विश्वचषक मिळवून दिला होता इतकेच नाही तर मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेत अर्शदीप सिंगनेच सर्वाधिक बळी मिळवले होते. डावाच्या शेवटी म्हणजे डेथ ओव्हरमध्ये अर्शदिप सिंगची गोलंदाजी प्रभावी ठरते. निवड समितीने निवडलेला हा संघ चांगला आहे. जुन्या आणि नव्या खेळाडूंना संधी देत जोश आणि होश यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही ठरले आहेत. चॅम्पियन ट्रॉफिसाठी निवडण्यात आलेला हा संघ संतुलित आहे हे मान्य करून नीवड समितीचे याबाबत अभिनंदन करावे लागेल. आता जबाबदारी आहे ती निवडण्यात आलेल्या या १५ खेळाडूंची. २०१३ नंतर भारताला चॅम्पियन ट्रॉफीवर नाव कोरण्यात अपयश आले आहे. हे अपयश झटकून नव्याने सुरवात करण्याची संधी या निमित्ताने या संघाला मिळणार आहे. १९९८ साली सुरू झालेली ही स्पर्धा भारताने २००२ आणि २०१३ साली जिंकली होती तर २०१७ साली भारत या स्पर्धेचा उपविजेता होता. या स्पर्धेसाठी निवड झालेले सर्व खेळाडू अनुभवी आहेत. एकदिवसीय सामने खेळण्याचा सर्वांना मोठा अनुभव आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ही स्पर्धा पाकिस्तानात होणार असली तरी भारताचे सर्व सामने दुबईत होणार आहे. संघात निवड झालेल्या सर्व खेळाडूंना दुबईत खेळण्याचा चांगला अनुभव आहे त्यामुळे देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करून भारताला १२ वर्षांनंतर चॅम्पियन ट्रॉफी जिंकून देण्याची जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील अशी आशा करूया.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# कुंभ मेळा: चेष्टा थांबवा !

भारतीय संस्कृती,इतिहास, श्रद्धा स्थाने याला मोठी परंपरा आहे.हिंदू धर्म हा या भूमीतील सनातन,पारंपरिक धर्म राहिला आहे,अजून हि आहे आणि पुढेही राहणार आहे.या सर्व पार्श्वभूमिवर सध्या प्रयाग येथे सुरू असलेल्या कुंभ मेळ्याच्या निमित्ताने एकूणच कुंभमेळा,त्याच्या विषयी होणाऱ्या टीका टिपण्यांचा स्वानुभवावर आधारीत समाचार घेणारा निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांचा लेख देत आहे.

\- संपादक



भारतात प्रयागराज , हरिद्वार,उज्जैन आणि नाशिक या ठिकाणी दर १२ वर्षांनी होणारे कुंभ मेळे हे पौराणिक काळापासून चालत आलेले आहेत. ते इतके पौराणिक आहेत की ,ते नेमके कधी सुरू झाले,हे आजतागायत कुणी सांगू शकलेले नाही.पण देव आणि दानव यांच्या मध्ये झालेल्या युध्दात अमृत कुंभ सांडून त्यातील अमृत या या ४ ठिकाणी असलेल्या नद्यात पडल्याने,या नद्यांमध्ये स्नान केल्यास आपल्या कडून कळत ,नकळत झालेली पापे धुतल्या जाऊन आपण शुध्द होतो,या धारणेमुळे हजारो वर्षांपासून ठरलेल्या पर्वणी च्या दिवशी आणि त्या दिवशी शक्य नसल्यास कुंभ पर्व काळात तरी या ठिकाणी जाऊन भाविक स्नान करीत असतात. यावेळी येणाऱ्या विविध साधूंचे विशेष महत्व असते.

आजच्या तथाकथित व्यवस्थापन जगात आपण हे लक्षात घेतले पाहिजे की,या कुंभ मेळ्यांचे कुणीही निमंत्रक ,आयोजक ,

व्यवस्थापक रहात आलेले नाही. तरीही कुठलेही आमंत्रण,निमंत्रण, जाण्यायेण्याच्या प्रवास खर्च,( भारतात मुस्लिमाना त्यांच्या पवित्र मक्केला जाण्यासाठी भारत सरकार अनुदान देते,इकडे लक्ष वेधावेसे वाटते ! त्याचे काय कारण आहे,कुणास ठाउक..)भारतीय पंचांगानुसार येत असलेल्या पर्वण्याना अशिक्षित समजले जाणारे भाविक ही कसे उपस्थित राहतात,हे एक आश्चर्यच आहे. या कुंभ मेळ्याना केवळ भारतातूनच नव्हे तर परदेशातून येणाऱ्या भाविकांची संख्या ही इतकी असते की,आज पर्यंत ती कधी मोजताही आलेली नाही. करोडो लोक इतक्या श्रध्देने, शिस्तीने,स्वतःहून येत राहतात, हे कुंभ मेळे आनंदात, शांततेत होत असतात,हे एक जागतिक आश्चर्य आहे. याचा खरे तर प्रत्येक हिंदू व्यक्तीस सार्थ अभिमान वाटला पाहिजे. पण दुर्दैवाने अभिमान तर राहिला दूरच पण अन्य धर्मियांपेक्षा काही हिंदूच या अभिमानास्पद कुंभ मेळ्याची चेष्टा करताना दिसत आलेले आहेत आणि अजूनही दिसत आहेत.काही चॅनल्स ,यू ट्यूब वर तर कोण साध्वी किती सुंदर आहे,त्यांची जणू सौंदर्य प्रतियोगिता असल्याप्रमाणे क्रमांक देण्यात येत आहेत,अतिशय चविष्टपणे त्यांच्या खोदून खोदून ,प्रश्न विचारून मुलाखती घेतल्या जात आहेत,तर कुणी आयआयटीयन बाबा,उद्योजक बाबा,परदेशी बाबा म्हणून रंगवून दाखविल्या जात आहेत. हे सर्व पाहून असे वाटते की,कुंभ मेळा ही काय मनोरंजनाची, चेष्टेची बाब आहे की काय ? बरं यात काही प्रसार माध्यमे,काही खाजगी व्यक्तींबरोबर सरकारी नोकरीत

उच्च पदांवर राहिलेले,ज्यांच्या वर हे कुंभ मेळे व्यवस्थित पार पाडण्याची जबाबदारी असलेले अधिकारी पाहून तर यांना ना हिंदू धर्म,भारतीय संस्कृती कळाली ना आपले , लोकशाही देशातील सरकारी अधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व कळाले,असे मी स्वानुभवाच्या आधारे ठामपणे सांगू शकतो. कारण आधी भारत सरकारच्या दूरदर्शन मध्ये आणि नंतर महाराष्ट्र शासनाच्या माहिती खात्यात नोकरी करताना मी हे दुष्चित्र प्रत्यक्ष पाहिले आहे,अनुभवले आहे. अर्थात याला काही सन्मान्य अपवाद देखील आहेत,त्याची सुध्दा दखल इथे घेतली पाहिजे.



अन्य राज्यातील कुंभ मेळ्यांशी माझा कधीं थेट संबंध आलेला नसल्याने मी नाशिक - त्रिंबकेश्वर येथे झालेल्या कुंभ मेळ्याविषयीच माझे अनुभव कथन,निरीक्षण,भावना मर्यादित आहेत,हे आधीच स्पष्ट करतो.

पहिल्यांदा आपण हे लक्षात घेतले पाहिजे की जिल्हास्तरीय सर्वात महत्वाचे,सर्वाधिक अधिकार असलेले,सर्व खाते, विभाग, सर्व यंत्रणा यांच्याशी संपर्क , सहकार्य, समन्वय



साधण्याची प्रमुख जबाबदारी असणारे पद म्हणून जिल्हाधिकारी यांच्या कडे पाहिल्या जाते. आणि ते खरेही आहे. हे अधिकारी आपली जबाबदारी कशी पार पाडतात,या वर त्या त्या कुंभ मेळ्याचे यश ,अपयश अवलंबून असते. इथे एक बाब ही लक्षात घेतली पाहिजे की प्रयाग, हरिद्वार ,उज्जैन या तीन ठिकाणी वैष्णव आणि शैव एकत्रच स्नान करीत असतात. पण नाशिक येथे पेशवे काळात प्रथम स्नान कुणी करावे ? या वरून शैव आणि वैष्णव या दोन्ही आखाड्यात वाद झाल्याने,पुन्हा असे वाद होऊ नये म्हणून,पेशव्यांनी वैष्णव आखाडे हे नाशिक येथे तर शैव आखाडे हे त्रिंबकेश्वर येथे स्नान करतील ,अशी व्यवस्था घालून दिली. तीच व्यवस्था आजतागायत कायम असल्याने नाशिक व त्रिंबकेश्वर अशा दोन ठिकाणी कुंभ मेळा भरत असतो. १९९२ साली नाशिक - त्रिंबकेश्वर येथे कुंभमेळा भरलेला असताना तत्कालीन जिल्हाधिकारी श्री उमेशचंद्र सरंगी यांनी ज्या पद्धतीने, आत्मीयतेने कुंभमेळा हाताळला,त्याची आजही जुन्या व्यक्ती आठवणी काढतात.भयंकर कोपिष्ट समजल्या गेलेल्या साधूंनी देखील सरंगी साहेबांच्या प्रशासनाची तारीफ केली होती.

पण त्या पुढील म्हणजे २००४ सालचा कुंभ मेळा तसे यश मिळवू शकला नाही.हा कुंभ मेळा लक्षात राहिला तो साधुंवर रस्त्यात उधळलेली नाणी उचलण्याच्या नादात झालेल्या भाविकांच्या चेंगराचेंगरीत काही भाविकांच्या झालेल्या दुर्दैवी मृत्युंमुळे .त्यावेळी तिथे हजर असलेल्या एकमेव दूरदर्शन कॅमेरामन ने केलेले चित्रीकरण पुढे या घटनेची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या आयोगापुढे सादर करण्यात आले. नाशिक चे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री महेश झगडे यांनी नुकतीच त्यांच्या फेस बुक वर त्रोटक पोस्ट टाकली की, त्यांना त्यावेळी शाही स्नानात भाग घेण्याची जराही इच्छा झाली नाही. असे लिहिण्यामागे त्यांचा काय हेतू असावा,हे त्यांचे त्यांनाच माहीत पण जणू जे काही चालले होते,ते काही बरोबर नव्हते म्हणून आपण त्या सर्व बाबींपासून दूर राहिलो होतो,असे म्हणण्याचा त्यांचा रोख दिसतो.

या कुंभ मेळ्याच्या वेळी मी मंत्रालयात उपसंचालक( वृत्त) या पदावर काम करत होतो. नाशिक विभागीय माहिती कार्यालयास कुंभ मेळ्याच्या दृष्टीने आवश्यक त्या बाबींचा समन्वय साधणे, वेगवेगळ्या राज्यातून तसेच विदेशातूनही येणाऱ्या माध्यम प्रतिनिधींना पासेस देणे,अशा स्वरूपाची कामे करावी लागत.फक्त मंत्रालयात बसून काम करण्यापेक्षा एक तरी पर्वणी स्वतः अनुभवावी म्हणून मी त्रिंबकेश्वर येथील ,जिथे नागा साधू स्नान करतात,तिथे आमच्या प्रसिद्धी पथकाबरोबर जाण्याची विनंती वरिष्ठांना केली. त्यावेळी आमचे महासंचालक ,श्री भूषण गगराणी होते,जे सध्या मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त आहेत,त्यांनी मोठ्या मनाने परवानगी दिली. आम्ही नाशिक विभागीय माहिती कार्यालयास पोहोचलो ,तर तिथे पाहिले की,आमचे नाशिक विभागीय माहिती उपसंचालक श्री उदयगिरी महंत हे ऐनवेळी आलेल्या काही परदेशी माध्यम प्रतिनिधींना पासेस नाकारत होते,कारण काय तर त्यांच्या कडे महाराष्ट्र शासनाची किंवा अन्य कोणत्याही राज्य सरकारची अधिस्विकृती पत्रिका नाही म्हणून. पण विशेष म्हणजे,त्यांच्या कडे भारत सरकारच्या माहिती व नभोवाणी मंत्रालयाने दिलेली अधिकृत पत्रे होती. ती पाहून मी त्यांना पासेस दिले पाहिजे,असे महंत यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण आडमुठेपणा साठी कुप्रसिद्ध असलेले महंत स्वतःचा हेका काही सोडेनात.शेवटी मी गगराणी साहेबांशी फोन वर बोलून वस्तुस्थिती अवगत केल्यावर त्यांनी महंत यांना समजावले आणि मग त्या परदेशी माध्यम प्रतिनिधींना पासेस मिळाले. खरं म्हणजे,परदेशी माध्यम प्रतिनिधी स्वतःहून आलेले आहेत,त्यांच्या कडे भारत सरकारची रितसर प्राधिकार पत्रे आहेत,त्यांना पासेस दिल्यामुळे परदेशात आपल्या कुंभमेळ्याची चांगली प्रसिद्धी होईल या सर्व बाबी विचारात न घेता,आपल्या हेकेखोर स्वभावामुळे,आपण आपल्या देशाची परदेशी माध्यम प्रतिनिधींसमोर प्रतिमा मलिन करतोय,याचे भानही त्यांना राहिले नाही.म्हणून अधिकाऱ्यांनी नियमांचा स्वतःला वाटतो तो अर्थ न घेता तारतम्य बाळगून काम करणे आवश्यक असते.

त्याच्या पुढच्या ,म्हणजे २०१६ साली झालेल्या कुंभ मेळ्याच्या आधी जवळपास मी ३ वर्षे नाशिक विभागाचा माहिती उपसंचालक असल्याने त्या ३ वर्षात,कुंभ मेळा आयोजनाविषयी सातत्याने झालेल्या सर्व शासकीय बैठका,भेटी ,पाहणी दौरे यांना मला उपस्थित राहावे लागले होते.अजूनही लक्षात राहिलेल्या काही बाबी म्हणजे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री विलास पाटील यांनी आयोजित केलेल्या बैठकांना नाशिक चे पोलीस आयुक्त, महानगर पालिका आयुक्त हे जिल्हाधिकारी यांना सेवाजेष्ठ असल्याने त्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकांना स्वतः उपस्थित राहणे म्हणजे कमीपणाचे ठरेल,असे समजून या बैठकांना स्वतः उपस्थित न राहता त्यांच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवित असत. साहजिकच त्यांच्या त्यांच्या विभागांविषयी निर्णय घ्यायची वेळ आली की ,ते कनिष्ठ अधिकारी हतबल होऊन,साहेबांना सांगतो एव्हढे सांगण्याशिवाय काही करू शकत नसत.त्यामुळे कित्येक वेळा या बैठका काही ठोस निर्णय न घेताच संपत असत.अधिकारीच माझे ऐकत नाहीत,तर मी काय करू? असे प्रसार माध्यमातील त्या जिल्हाधिकाऱ्यांचे विधान त्यावेळी चांगलेच गाजले होते.यात परत त्यांची मुळातच अशी भूमिका होती की,कुंभ मेळा ही पूर्णपणे धार्मिक बाब असल्याने शासनाचा ,या सर्व आयोजनाशी संबंधच काय ? ही त्यांची भावना,भूमिका खुद्द त्यांच्या महसूल खात्याच्याच नव्हे तर इतर सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांमध्ये झिरपत गेली असावी . त्यामुळे कुंभ मेळा एकदिड वर्षावर येऊन ठेपलेला असताना,शासनाने शेकडो करोडो रुपयांची तरतूद उपलब्ध करून दिल्या नंतर ही प्रत्यक्ष कामांमध्ये काहीच प्रगती होत नव्हती. ही बाब शेवटी मंत्रालय पातळीवर लक्षात आल्याने काही तत्काळ उपाययोजना सरकार ने केल्या,त्यातील काही प्रमुख म्हणजे,जिल्हाधिकारी, महानगर पालिका आयुक्त, पोलीस आयुक्त या तिघांच्या तातडीने बदल्या केल्या. उज्जैन येथील कुंभ मेळा आयोजनाचा अनुभव असलेले अधिकारी श्री दिपेंद्रसिंह कुशवाहा यांची नाशिक जिल्हाधिकारी म्हणून तर नाशिक विभागीय आयुक्त म्हणून श्री एकनाथ डवले यांची नेमणूक करण्यात आली. तसेच श्री श्रीकांत सिंग आणि मनीषा म्हैसकर पाटणकर या दोघा सचिवांची देखरेख समिति स्थापन करण्यात आली. या नेमणुका झाल्या नंतर मात्र ज्या झपाट्याने सर्व कामांना प्रत्यक्षात जी गती प्राप्त होत गेली,त्यामुळे हा कुंभमेळा कसा काय पार पडेल ? या विविध खात्यांच्या अधिकाऱ्यांमध्ये निमार्ण झालेला संभ्रम दूर होत गेला आणि सरतेशेवटी २०१६ चा कुंभमेळा व्यवस्थित पार पडला. आतापासून २०२८ साली नाशिक - त्रिंबकेश्वर येथे भरणाऱ्या कुंभ मेळ्या विषयीच्या बैठका,निधीची तरतूद आदी बाबी सुरू झाल्या आहेत . तो कुंभ मेळा देखील यशस्वी झाल्याचे मला एक भाविक म्हणून बघता येईल, अशी आशा आहे.

**देवेंद्र भुजबळ - ९८६९४८४८००**

**पान १ वरुन**

### महसुल विभागाच्या ...

उपविभागीय अधिकारी व तहसीलदार तसेच सर्व कर्मचारी उपस्थित होते. आज पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये आपला सहभाग नोंदवला. या क्रीडा स्पर्धांमधून उत्कृष्ट खेळाडूंची निवड करून सदर उत्कृष्ट खेळाडू हे आगामी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धेत आपला सहभाग घेणार आहेत.

### खोतकर -अंबेकरांनी ...

यांनी गेल्या वीस वर्षापासून मधुबन कॉलनी सिंग डबल जीन लक्ष्मण नारायणपुरा भागाचे नगरसेवक पदाचे नेतृत्व केलेले आहे त्यामुळे आंबेकर आणि खोतकर यांनी एकत्रित यावं अशी मागणी प्रभागातील नागरिकांनी केली आहे यावेळी सिद्धिविनायक मुळे. ह भ प भागवताचार्य विश्वास महाराज भागवत. ह भ प भागवताचार्य प्रमोद महाराज भागवत. अनंत उर्फ आर्यन म्याका. प्रशांत गाडे. सुखविंदर सिंग चव्हाण शुभम टेकाळे अविनाश भंडे. साई राज पाचफुले .राजूभाऊ कतारे. अनिल भाऊ गव्हाणे सर प्रा प्रदीप तौर सर. अरुण पवार राजकुमार गुंटूक .गणेश गुंटूक. अविनाश कुदनकर अमेय पंचायत. दीपक घाटोळ. सुनील वर्मा. रोहित शहा. ज्येष्ठ नागरिक साहेबराव शेळके धानी साहेब संभाजी अंभोरे पाटील आधी शिवनेरी नगर कॉलनीतील पुरुष व महिला भगिनी उपस्थित होत्या.

## लाडकी बहीण दोडकी झाली ?

राजकारणी जनतेच्या करातून मिळणाऱ्या उत्पन्नच विकासासाठी उपयोग न करता सत्तेच्या मतांसाठी स्वार्थापोटी लाडकी बहीण योजनेचा लाभ उठवला आणि आता काही हजार अपात्र बहिणींनी माघार घेतली हे अभिनंदनीय आहे. गरज सरो वैद्य मरो असा स्वार्थीपणा जिंकून आलेल्या महायुतीतील उमेदवारांनी केला आहे. अपात्र बहिणींनी ज्यांना मतदान केले त्या उमेदवाराची मतसंख्या घटवली तर हजार दोन हजार मतांनी निवडून आलेले उमेदवार यांना पराभूत म्हणून जाहीर केले तर महायुतीचे उमेदवार किती उरतील हेही जाहीर करायला पाहिजे. ज्या अपात्र बहिणींनी सरकारच्या ढिसाळ कारभाराचा लाभ उठवला. त्यातील किती परत करतील याची शास्वती नाही. त्यांच्यावर सरकार कारवाई करणार असतील तर ते योग्य होणार नाही. मासिक ३७०० कोटी खर्च होतोय तो कमी होईल त्यातही भ्रष्टाचार होणार नाही ह्याची खात्री कशी करणार ? सरकारने जी चूक केली त्याची भरपाई म्हणून महायुतीतील सर्व घटक पक्षाने आपल्या मासिक मिळणाऱ्या पगार भत्ते यातून पन्नास टक्के रक्कम जोपर्यंत अतिरिक्त अपात्र बहिणींना दिलेली रक्कम पूर्ण होत नाही पर्यंत कापून घ्यावी. परत पैसे घेणार नाही असे वक्तव्य अदिती तटकरे यांनी केले दिलदारपणची, मोठपणाची मिरवण्याची भाषा बंद करावी कारण जनतेने निवडून दिलेले सरकार हे ट्रष्टी आहेत. राज्याचे मालक नाही ह्याची जाणीव ठेवावी. लाडक्या बहिणीसाठी जनतेच्या करातून १५०० दिले गेले. त्यात मुख्यमंत्रीसाहित संपूर्ण महायुतीतील सत्ताधाऱ्यांची किती आर्थिक मदत झाली हे ही जनतेसमोर आले पाहिजे. राज्यावर वाढता कर्जाचा बोजा पाहता लोकप्रतिनिधींनी उधळपट्टीला लगाम घालावा. बेरोजगारांच्या हाताला काम कसे मिळेल ह्याची तजवीज करावी.

**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ९९२०७७६२७७**

# स्व. सुभेदार बंधुस्मृती सेवा गौरव पुरस्कार चांगल्या कामासाठीची प्रेरक प्रेरणा ठरावी - ॲड. किरणराव सुभेदार

**परभणी । प्रतिनिधी -** स्व.सुभेदार बंधु स्मृती सेवा गौरव पुरस्कार अधिक चांगल्या कामासाठीची प्रेरक प्रेरणा ठरावी,हा उदात्त हेतू समोर ठेवत नूतन परिवारातील उत्कृष्ट शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी यांचे साठी नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था,परभणी आणि सुभेदार परिवाराच्या वतीने आयोजित स्व.सुभेदार बंधु स्मृती सेवा गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात संयोजक ड.किरणराव सुभेदार बोलत होते.




कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हेमंतराव जामकर यांची उपस्थिती होती.विशेष अतिथी ड.मंजूषा प्रभूणे-सुभेदार तर प्रमुख उपस्थिती नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ड.किरणराव सुभेदार, कोषाध्यक्ष डॉ.अभयराव सुभेदार,सचिव विजयराव जामकर,संचालक सौ. दिपलक्ष्मीताई जामकर, सौ. कविताताई सुभेदार, ड.मंगेशराव सुभेदार. सदस्य सौ.संध्याताई जामकर, सौ.मृणालताई सुभेदार, सौ. मुग्धाताई सुभेदार, हर्षलजी सुभेदार, सौ.स्नेहाताई सुभेदार शंतनूभैय्या सुभेदार, सुकन्या आरोही सुभेदार, प्राचार्य डॉ. वसंतराव भोसले, मुख्याध्यापक / प्राचार्य आर.के. चव्हाण, मुख्याध्यापक जी.एन.शिंदे, मुख्याध्यापक जयश्रीताई हत्तीअंबीरे यांची उपस्थिती होती.

स्व.राजाभाऊ सुभेदार, ड. बाळासाहेब सुभेदार, कै. सौ. कमलताई जामकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकातून प्राचार्य डॉ.वसंतराव भोसले यांनी पुरस्कारा विषयीची माहिती देत पुरस्कारा मागील सुभेदार परिवाराची भूमिका विशद केली. डॉ.अभयराव सुभेदार यांनी सुभेदार बंधुंच्या पुण्यस्मरणार्थ स्व.सुभेदार बंधु सेवा गौरव पुरस्कारा बरोबरच सर्व रोगनिदान शिबीर, मोफत औषधोपचार, आणि आरोग्य विषयक तज्ज्ञ डॉक्टरांचे व्याख्यान पुढील वर्षी पासून सुरू केले जाणार असल्याचे जाहीर केले.

सुकन्या आरोही सुभेदार यांनी पुरस्कार वितरण सोहळया विषयी मनोगत मांडत पुरस्काराचे मानकरी यांनी पुरस्काराचा स्विकार केल्या बद्दल सुभेदार परिवाराच्या वतीने आभार व्यक्त केले.

या पुरस्कारा साठी मला पात्र समजून पुरस्कार देवून मला सन्मानित केले.पुरस्कारा मुळे जाणिवपूर्वक,अधिक जबाबदारीने कार्य करण्याची प्रेरणा लाभली असे मत कै. सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय परभणी चे डॉ.अभिजित सरनाईक ( संचालक शारीरिक शिक्षण ) यांनी मांडले.

कै.रावसाहेब जामकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक साहेबराव गायकवाड यांना पुरस्कार देवून सन्मानित केले.

सदरील पुरस्कारामुळे अध्ययन, अध्यापन करत विद्यार्थ्यांची विधायक जडणघडण करण्याची जबाबदारीत विशेष भर पडली ती प्रामाणिक परिश्रमातून सिध्दीस नेवू अशी भूमिका नूतन मुला - मुलींचे हायस्कूल सुभाष रोड परभणी चे सहशिक्षक विजयकुमार खंदारे पुरस्कार प्राप्त उत्कृष्ट शिक्षक यांनी मांडली. उत्कृष्ट शिक्षकांसह प्रशासकीय कर्मचारी गजानन कुलकर्णी यांचा शाल ,सन्मान चिन्ह,सन्मानपत्र तर प्रशालेचे उत्कृष्ट विद्यार्थी कै. रावसाहेब जामकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता सातवी चा संविधान कांबळे, नूतन मुलामुलींचे हायस्कूल इयत्ता नववीचा व्यंकटेश बुरांडे यांना सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शैक्षणिक साहित्या सह मान्यवरांचे हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन प्रा.अरुण पडघन केले.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आगामी येणाऱ्या शिवजयंतीचे औचित्य साधुन १५ वर्षा खालील मुलां - मुलींसाठी जालना शहरात कौशल्य बहुउद्देश्यीय सेवाभावी संस्थे तर्फे शिवकालीन शस्त्रविद्येचे प्रक्षिक्षण शहरात विविध ठिकाणी सुरु केले.

# अंबड तालुका वकील संघाच्या अध्यक्षपदी दीपा गायकवाड



**अंबड । प्रतिनिधी -** तालुका वकील संघाच्या २०२५ साठी कार्यकारी मंडळाची निवडणूक शनिवारी ता. १८ रोजी पार पडली. ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली होती यामुळे कोण विजयी होणार याकडे तालुक्याचे लक्ष लागले होते मात्र वकील संघटनेच्या सर्व सदस्यांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एकमताने अध्यक्षपदी अड.दीपा गायकवाड, उपाध्यक्ष अड. रवी राठोड , सचिव अड. प्रदिप होंडे, सहसचिव अड. गणेश मांगदरे, कोषाध्यक्ष अड श्रीहरी मुळे, ग्रंथालय सचिव अड. एम.के भोजने यांची सर्वांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून अड आर. टी.कुलकर्णी,अड खंडु धबडकर,अड.डी.एल भोजने व जेष्ठ वकिल सहभागी होते.

यावेळी नूतन अध्यक्ष अड दीपा गायकवाड म्हणाल्या नूतन पदाधिकारी हे वकील संघातील सर्व सदस्यांना बरोबर घेऊन काम करीन न्यायालयात दैनंदिन कामकाज करताना वकीलांना येणाऱ्या अडचणी त्या सोडवल्या जातील. मला या निवडणुकीत सहाकार्य करणार्या सर्व वकील बांधवांचे मी मनापासून आभार मानते.

# साहित्यिक आसूड: सोयरीक पुस्तिकांचे सोवळे सत्य

विवाहसंस्था ही भारतीय समाजाचा गाभा आहे. परंपरा, संस्कृती, आणि समाजाची मानसिकता यांचे प्रतिबिंब आपल्या विवाह पद्धतीत दिसते. मात्र, या गाभ्याभोवती काही वेगळीच व्यापारी वलये तयार झाली आहेत, जी विवाह संस्थेचे गांभीर्य, पावित्र्य आणि भावनिक मूल्य दुर्लक्षित करून याला केवळ आर्थिक व्यवहार बनवतात. याचाच एक भाग म्हणजे 'सोयरीक पुस्तिका'.

**सोयरीक पुस्तिकांचे स्वरूप व हेतू**

कधी काळी सोयरीक पुस्तिका हा समाजजागृती आणि परिचयाचा प्रभावी मार्ग मानला जात असे. तेव्हा सामाजिक स्नेह जपण्याचा आणि कुटुंबांना एकमेकांशी जोडण्याचा हा एक सोपा मार्ग होता. मात्र, तंत्रज्ञानाच्या युगात, इंटरनेट आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या उपलब्धतेने याची उपयुक्तता जवळपास शून्य झाली आहे. तरीही, या क्षेत्राचा व्यापारी वापर करणारे काही जण त्याला अनावश्यक महत्त्व देत राहिले आहेत.

आज या पुस्तिकांची छपाई करणारे, विक्रेते आणि प्रकाशक या प्रथेला समाजकार्याचा मुखवटा चढवून लोकांच्या भावना, परंपरा आणि गरजांचा गैरफायदा घेत आहेत. तथाकथित समाजकार्यातून हे पुस्तक विक्रेते समाजात कोणतेच सकारात्मक योगदान देत नाहीत, उलट ते केवळ व्यक्तिगत फायद्यासाठी या व्यवस्थेचे शोषण करत आहेत.

**तंत्रज्ञानाचा काळः नव्या साधनांची गरज**

आज मोबाइल ॲप्स, वेबसाईट्स आणि सोशल मीडियाने माहिती देणे, संपर्क वाढवणे, तसेच सोयरीक जुळवणे सहज आणि विनामूल्य शक्य केले आहे. उदा., शादी डॉट कॉम, जीवनसाथी डॉट कॉम यांसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर जिथे व्यक्ती स्वतःचे प्रोफाईल तयार करू शकते, तिथे सोयरीक पुस्तिकांसाठी पैसे खर्च करण्याची गरज उरलेली नाही.

**सोयरीक पुस्तिकेतील त्रुटी**

सोयरीक पुस्तिकांमध्ये मर्यादित माहिती दिली जाते, तीही कधी कधी दिशाभूल करणारी असते. उदाहरणार्थः

जात, पंथ, व्यवसाय यांची अतिरंजित माहिती देऊन प्रत्यक्ष स्थळापेक्षा वेगळे चित्र रंगवले जाते.

व्यक्तीचे आर्थिक स्थैर्य, शिक्षण आणि कुटुंबाची पार्श्वभूमी याबद्दल अपूर्ण माहिती मिळते.



**सामाजिक समांतरतेला बाधा**

सोयरीक पुस्तिकांचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे मुख्यत्वे वर्गभेद, आणि रूढींचा बळावलेला प्रचार.

डिजिटल माध्यमे किंबहुना फार कशाला आमच्या सुनील भाऊंनी चोखाळलेली वेगळी वाट अत्यंत पारदर्शी विवाहपद्धतींना प्रोत्साहन देत असताना, सोयरीक पुस्तिकांच्या चाकोरीबद्ध माध्यमातून हा दोन मनांना, दोन घराण्यांना जोडणारा अत्यंत संवेदनशील विषय हाताळणे अप्रशस्त वाटते.

सुनीलभाऊंनी सुरू केलेला हा प्रयोग वरील पार्श्वभूमीवर खूप प्रभावशाली ठरत आहे. त्यांनी समाजातील दिग्गज प्रभृतींना हाताशी घेऊन ठिकठिकाणी आयोजित केलेला हा सोहळा एका मोठ्या सामाजिक क्रांतीची नांदी ठरेल असा विश्वास निर्माण होण्याइतपत हा महोत्सव अभूतपूर्व यश मिळवत आहे.

कारण भाऊंनी समाजाची नाडी ओळखली आहे. समाजातील आर्थिक क्षमतेनुसार बनलेल्या वर्गभेदाच्या भिंती ही खरं तर समाजाला शक्तीहिन करणारी दुर्दैवी बाब, पण ह्या अक्षमतेचंच सक्षमीकरण करण्याचा सुनीलभाऊंनी विडा उचलला आहे. (थोडक्यात ह्या weakness लाच त्यांनी strength बनवलं आहे).

उच्चवर्गीय सामाजिक घटकांना आज रोजीरोटीची तर नाहीच पण सर्वसामान्यांना जाणवणाऱ्या तथाकथित चिंताही नाहीत. एखाददुसरं अपवादात्मक उदाहरण सोडल्यास त्यांच्या अपत्यांच्या विवाहाची काळजी करण्याचंही त्यांना कारण नाही तरीसुद्धा हे लोक आवर्जून एक काम सहज करू शकतात, आणि ते म्हणजे समाजकारण. समाजाचे आपण देणे लागतो, हे बाळकडू छत्रपती शिवाजी महाराजांना दैवत मानणाऱ्या आम्हां सर्वांच्या रक्तातच भिनले आहे. म्हणून ही फळी सुनीलभाऊंनी आर्थिक स्त्रोतासाठी वापरण्याचं ठरवलं. ज्यांच्याकडे सामाजिक प्रश्न हाताळण्यासाठी डोळस दृष्टी आणि शैक्षणिक भांडवल किंवा ज्ञानाची आयुधे आहेत त्या समाजबांधवांना त्यांनी *विवाह विषयक समस्या आणि त्यांच्या निराकरणासाठी विविधांगी उपाययोजना* ह्या कळीच्या मुद्द्यावर चर्चा करायला प्रवृत्त केलं आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ह्या दोन्ही गोष्टी साधून त्यांना समाजातील तळागाळातील घटकांना देखील दिलासा द्यायचा आहे. ह्या सर्वसमावेशक दृष्टीकोनातून देशभरातच नव्हे तर देशाबाहेरील विखुरलेल्या मराठा म्हणवणाऱ्या अठरा पगड जाती-पोटजातींना त्यांना एकत्र आणायचे आहे. शिवाजी राजांचा मावळा म्हणवणाऱ्या प्रत्येक समाजबांधवाच्या मनामध्ये ह्या जाणिवेची ज्योत पेटवायची आहे आणि ती प्रज्वलितही ठेवायची आहे.

त्याच एकमेव हेतूने वेडा झालेला हा शहाणा माणूस सर्वत्र फिरतो आहे मुला मुलींच्या विधात्याने स्वर्गात बांधलेल्या गाठींच्या शोधार्थ.....

समाजातील प्रत्येक उपवराला सुयोग्य वधू आणि प्रत्येक उपवधूला सक्षम वर मिळावा म्हणून.....

आणि हे सर्व करताना सुनीलभाऊ स्वतःच्या कुटुंबाची मुळीच काळजी करीत नाहीत. तो वसा लिलया पेलण्यासाठी त्यांनी वहीनींना सक्षम बनवलं आहे. तो प्रांत वहीनींचा असं ते बिनदिक्कत सांगतात...

आश्चर्य म्हणजे त्यांच्या या अफलातून संयोजनाला मिळत असलेलं यश पाहून भले भले स्तिमित होत आहेत.

त्यामागे कारणही आहे. ह्या मेळाव्यातून उपवर कन्या आणि उपवधू मुले जेव्हा व्यासपीठावरून स्वत:ची ओळख करून देतात तेव्हा उपस्थित मुलं, मुली आणि पालक सर्व त्यांना ऐकत असतात. मुला मुलींनी स्वतः विषयी दिलेली माहिती खोटी असण्याची भिती या पारदर्शक वातावरणात उरतच नाही. अन मग ह्या मेळावा प्रपंचातून फुलतात जन्मजन्मांतरीच्या रेशीमगाठी. अन त्याचबरोबर फुलते सुनीलभाऊंची छाती..!

अशा प्रकारे जुळलेल्या सर्व विवाहोत्सुक मुलामुलींचे ते मानसपिता असतात. त्यामुळे आपणही सर्व त्यांच्या या मौलिक कार्याला मनापासून सुयश चिंतूया.... !!!

जय सुराज्य, जय शिवराय !!!

# अमृता सोपान शिंदेला सुवर्णपदक

**बदनापूर । प्रतिनिधी -** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड, महाराष्ट्र द्वारा आयोजित ६८ व्या राष्ट्रीय शालेय बेसबॉल स्पर्धा १४ ते १८ जानेवारी २०२५ या कालावधीत घेण्यात आल्या. स्पर्धेत महाराष्ट्र मुले व मुली दोन्ही संघाने उत्कृष्ट खेळी करत सुवर्णपदक संपादन केले आहे. सदर १९ वर्षे आतील मुली संघात सेलगाव येथील जिजाऊ ज्युनिअर कॉलेजची अमृता सोपान शिंदे हिने संघास उकृष्ट खेळी करत अंतिम सामन्यात छत्तीसगड राज्यास नमवून सुवर्णपदकावर महाराष्ट्र राज्याचे नाव कोरले आहे. अमृता हिने १४ वर्षे व १७ वर्षे वयोगटात सुद्धा राष्ट्रीय शालेय बेसबॉल स्पर्धेत अनुक्रमे मध्य प्रदेश व छत्तीसगड येथे चमकदार कामगिरी केली होती. या यशाबद्दल जिजाऊ ज्युनिअर कॉलेज सेलगावचे अध्यक्ष गजानन पाटील-वाळके, प्राचार्य पवार, विजय गाडेकर यांनी अभिनंदन केले आहे. त्याच बरोबर जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, जालना जिल्हा बेसबॉल असोशियशनचे अध्यक्ष निवृत्ती दिवटे, सचिव एकनाथ सुरुशे, कोषाध्यक्ष प्रमोद खरात व पदाधिकारी यांनी या यशाबद्दल अमृता शिंदेचे विशेष अभिनंदन केले आहे.




# मेळावा व सामाजिक न्याय मंत्र्याचा सत्कार सोहळा; सर्वांनी उपस्थित राहण्याचे ॲड. चव्हाण यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील अनुसुचित जातीच्या आश्रम शाळेच्या वतीने दि. १९ जानेवारी २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यात सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांच्या सत्काराचेही आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला आश्रम शाळेच्या सर्व संस्थाचालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन अनुसुचित जाती आश्रम शाळा संघटनेचे अध्यक्ष ॲड. ब्रम्हानंद चव्हाण आणि महेंद्र रत्नपारखे यांनी शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ४ वाजता केलंय.

अनुसूचित जातीच्या निवासी शाळा या २००२ पासून आजपर्यंत चालू आहेत. त्याला अनुदान मिळालेले नाही. शासनाने शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे पगार दिलेले नाहीत. अशा शाळेवर कार्यरत असलेल्या ५ हजार कर्मचार्यांचा हा प्रश्न आहे. या शाळेत सुमारे १५ ते २० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्यातील सुमारे १६५ शाळा पात्र असून त्या शाळेला पैसे देण्याच्या अनुषंगाने शासनाकडे प्रस्ताव सादर झालेला आहे. या शाळेची तपासणी आयुक्तामार्फत करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस हे मुख्यमंत्री असतांना २०२१९ ला शाळेला दरवर्षी २० टक्के अनुदान देण्याचे जाहीर केले आणि तसा जीआर काढला होता. परंतु, आजपर्यंत काहीच मिळाले नाही. शासनाने १००% अनुदानावर कर्मचार्यांचा पगार, मुलांचे मेंटेनन्स, ध्ये केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले आणि सर्वांच्या भूमिकेमुळे बीजेपी, शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षाला महाराष्ट्रातून तमाम आंबेडकरी वादी विचारांच्या लोकांनी भरघोस मतदान केलंय.

ओपनच्या शाळांना सरकारनं अर्थसहाय्य केले.



घरभाडे देण्यात यावे. असंही ॲड. ब्रम्हानंद चव्हाण यांनी म्हटलंय.

या शाळेवर २००५ पासून शिक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांचा विचार केला पाहिजे. हा विषय सामाजिक न्याय मंत्री यांच्या आखत्यारीत आहे. त्यामुळे या मेळाव्यात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट हे येणार आहेत. त्यांच्याकडे आम्ही हा विषय मांडणार असून ते नक्कीच न्याय देतील असा विश्वास ॲड. ब्रम्हाणंद चव्हाण यांनी व्यक्त केलाय. या निवडणुकीम त्यांना १०० टक्के पगार चालु केलेत. तसेच सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनीही अनुसूचित जातीच्या आश्रम शाळेला अनुदान द्यावे अशी मागणी आहे. काही अडचण आल्यास केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना बोलून मुख्यमंत्र्याकडे सुद्धा पाठपुरावा करणार आहोत. त्यासाठी या मेळाव्याला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन अनुसुचित जाती आश्रम शाळा संघटनेचे अध्यक्ष ॲड. ब्रम्हानंद चव्हाण यांनी केले.

### सप्तगड हौसिंग सोसायटी कोतवाल वाडी चरोली पुणे येथे संयुक्त उपक्रम

# राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती फुले, फतिमा शेख, मुक्ता साळवे यांची संयुक्त जयंती साजरी

**पुणे । प्रतिनिधी -** महाराष्ट्रात प्रथमच स्वराज्य प्रेरीत राजमाता जिजाऊ मॉसाहेब, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, फतिमा शेख आणि मुक्ता साळवे यांची ही संयुक्त जयंती साजरी करण्यात ते आली. त्यानिमित्ताने पिंपरी चिंचवडंचे माजी महापौर नितीन काळजे, नगरसेवक सचिन तापकीर आणि शिवव्याख्याते संपत गारगोटे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले आपल्या भाषणामध्ये बोलतांना नितीन काळजे यांनी उपस्थितांना जिजाऊसाहेब, सावित्रीबाई फुले, फतिमा शेख आणि मुक्ता साळवे यांच्याविषयी मार्गदर्शन केले. तसेच शिवव्याख्याते संपत गारगोटे यांनी त्यांच्या विचारातुन उपस्थितांना संबोधित करत असतांना हि महाराष्ट्रातील पहिलीच संयुक्त जयंती आहे. ती सप्तगड सोसायटी मध्ये साजरी होत आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे. यावेळी उपस्थित जिजाऊच्या लेकी चिमुकल्या यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी त्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.



कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सनी गवई यांनी केले. कार्यक्रमांचे नियोजन रंगनाथ वाघमारे, रशिद भाई, सदानंद उदागे, राजु इंगळे, प्रविण सोनवणे, राजेश आखाडे, मुनवर शेख, अशोक गायकवाड, राजेश ढगे, धनराज मनोहर, शिवाजी शिंदे, अरविंद केदारी, जिवन कांबळे यांनी केले. शेवटी आभार रंगनाथ वाघमारे यांनी मानले.

# हिरकणी पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक क्षेत्रात काम करणार्या महिलांचे कौतुक होण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून जालना येथील हिरकणी ग्रुप आणि उज्वल बहुउद्देशील सेवाभावी संस्थेच्या वतीने हिरकणी पुरस्कार देण्यात येतो. या वर्षी देखील या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असून त्यासाठी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या आणि सामाजिक क्षेत्रात योगदान देणार्या पात्र महिलांनी हिरकणी पुरस्कारासाठी अर्ज करावेत असे आवाहन संस्थेच्या अध्यक्ष सौ. करुणाताई मोरे आणि सामाजिक कार्यकर्त्या सौ. रसना देहेडकर यांनी आहे.

महिलांनी केलेल्या कर्तबगारीचे कौतुक व्हावे आणि त्यांना काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी दर वर्षी हिरकणी पुरस्कारासाठी कर्तबगार महिलांची निवड केली जाते. त्यामुळे विविध क्षेत्रात कार्य करणार्या आणि समाजासाठी भरीव योगदान देणार्या महिला या पुरस्कारातही अर्ज करू शकतात. या पुरस्कारासाठी कोणत्याही प्रकारची नोंदणी फी नाही. किंवा या पुरस्कारासाठी कोणतेही शुल्क भरण्याची गरज नाही. केलेल्या कामाचा प्रस्ताव परिपूर्ण पाठवावा. अर्जानुसार केलेल्या कामाचे मुल्याकंन करून पुरस्कार निवड समिती पात्र महिलेची पुरस्कारासाठी निवड करेल. निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील. राज्यातील किंवा राज्य बाहेरील कोणत्याही महिलेला या पुरस्कारासाठी अर्ज करता येईल. या पुरस्कारासाठी भाषा, जात, प्रांत असा कोणताही भेद नाही. सर्व समाजातील, सर्व भाषेच्या तसेच सर्व प्रांताच्या महिला या पुरस्कारासाठी अर्ज करू शकतील. पुरस्काराचे अर्ज हे ऑनलाई पध्दतीने https://forms.gle/cRK8DHvm3LSEhdm99 या लिंकवर फॉर्म भरुन दि. १० फेब्रुवारी २०२५ पर्यत सादर करता येतील. सादर करता येतील. निवड झालेल्या महिलांना कार्यक्रमाचे स्थळ आणि वेळ कळविण्यात येईल. त्यामुळे जास्तीत जास्त महिलांनी या पुरस्कारासाठी अर्ज करावेत असे आवाहन सौ. करुणाताई मोरे आणि सामाजिक कार्यकर्त्या सौ. रसना देहेडकर यांनी केलं आहे.

# रोटरी क्लबच्या मोफत प्लास्टिक सर्जरीसाठी मराठवाड्यातील दोनशे रुग्णांची निवड

## प्राथमिक तपासणी शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी -** रोटरी क्लब ऑफ जालना आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने जालना शहरात फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या दहा दिवसीय भव्य मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिरासाठी आज रविवार दि. १९ जानेवारी रोजी आयोजित प्राथमिक तपासणी शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. जालना जिल्ह्यासह मराठवाडा, विदर्भातील रुग्णांनी त्यात सहभाग नोंदविला. दोनशे रुग्णांची निवड करण्यात आली.

मिशन हॉस्पिटलमध्ये सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत प्राथमिक तपासणी करण्यात आली. याप्रसंगी जालना जिल्हासह मराठवाडा, विदर्भातील मेहकर, बुलढाणा, पुसद तसेच नांदेड, धर्माबाद, जळगाव आधी जिल्ह्यातून उपस्थित फाटलेले ओठ, तोंड व चेहऱ्याची विकृती, जळीत जखमा, चिकटलेली बोटे, अपघातात झालेल्या जखमा तसेच अन्य जन्मजात विकृती असलेल्या रुग्णांची



तपासणी करण्यात येऊन पात्रता निश्चितीनंतर जालन्यात २२ फेब्रुवारी ते ४ मार्चदरम्यान होणाऱ्या दहा दिवशी मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिरासाठी २०० रुग्णांची निवड करण्यात आली. त्यांना शस्त्रक्रियेची तारीख कळविले जाणार आहे.

गेल्या १९ वर्षापासून मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिर आयोजित करण्यात येत आहे. दरवर्षी जर्मन येथील बारा डॉक्टरांची तज्ञ टीम व मुंबईतील नामांकित प्लास्टिक सर्जन डॉ. अनिल टिबरेवाल आणि त्यांचे सहकारी तज्ज्ञ सर्जन या शिबिरात सेवा देत आहेत.

प्राथमिक तपासणी शिबिराच्या यशस्वीतेसाठी रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया, सचिव रवी भक्कड, शिवपाल शर्मा, सुरेश अग्रवाल, आर. बी. मुंदडा, विनोद मोतीवाला, रोटरी पदाधिकारी आणि सदस्यासह मिशन हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. ख्रीस्टोफर मोजेस व हॉस्पिटलच्या स्टाफने विशेष परिश्रम घेतले.

# पंकजाताईंच्या रूपाने महिला पालकमंत्री हा नारीशक्तीचा गौरव- ॲड. अश्विनी धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** पंकजा मुंडे यांच्या रूपाने जालन्याला मिळालेला पहिल्या महिला पालकमंत्रीपदाचा मान म्हणजे हा एक प्रकारे महिलांचा गौरव असून, ही बाब महिलांच्या सक्षमीकरणाचे प्रतीक ठरली आहे. त्यांच्या पालकमंत्रीपदी नियुक्तीने राज्यात महिलांच्या नेतृत्वाला नवी दिशा मिळाल्याची भावना इन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनच्या अध्यक्ष ड. अश्विनी धन्नावत यांनी व्यक्त केली आहे.

जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून नुकतीच पंकजाताई मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल ड. धन्नावत यांनी थेट ना. पंकजाताईंशी मोबाईलवर संपर्क साधून त्यांचे अभिनंदन केले. त्यांच्याशी संवाद साधताना ड. धन्नावत म्हणाल्या की, आपली ही नियुक्ती म्हणजे नारीशक्ती आणि महिलांच्या कर्तृत्वावर दाखवलेला विश्वास आहे. सोबतच लिंग समानता आणि महिला सक्षमीकरणाला बळ देणारा हा निर्णय आहे. हा एकट्या पंकजाताई मुंडे यांचा सन्मान नाही तर राज्यातील तमाम महिलांचा सन्मान असून, आपल्या माध्यमातून महिलांना त्यांच्या प्रगतीच्या मार्गातील अडथळे पार करून स्वप्नांचा पाठलाग करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास ड. धन्नावत यांनी व्यक्त केला. पंकजाताई यांनी या शुभेच्छांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून फक्त पालकमंत्री म्हणून नाही तर महाराष्ट्रातील प्रत्येक महिलेची प्रतिनिधी म्हणून काम करणार असून, आपण एकत्र येऊन महिलांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगारातील समान संधी सुनिश्चित करण्यासाठी काम करूयात, अशी साद त्यांनी घातली.

पंकजाताई यांची या प्रतिष्ठित अशा पालकमंत्री पदावरील नियुक्ती म्हणजे महिलादेखील सर्व क्षेत्रात आणि तळागाळात जाऊन उत्कृष्ट काम करू शकत असल्याचा, राज्यकारभाराच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग आवश्यक असल्याचा संदेश आहे. पंकजाताई यांचे कौशल्य आणि दूरदृष्टीमुळे जालना जिल्ह्यातीलच नव्हे राज्यातील महिलांचे भविष्य उज्वल बनेल, असा विश्वास ड. धन्नावत यांनी व्यक्त केला.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.